| | |
|---|---|
| MHKO110009832016 | **नियमित दिवाणी दावा क्र. १६४/२०१६**<br>**निशाणी क्रमांक ७८ वरील आदेश**<br>**( श्री.सुरेंद्र धोंडीराम शिंदे वगैरे २ //विरुध्द// श्री.तुकाराम दादू गुरव वगैरे)** |

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुध्द कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. परंतू दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीचे वर्णनामध्ये मौजे तळसंदे, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथिल सि.स.नंबर ६०१ याचे क्षेत्र ६८६.७ चौ.मी.यापैकी उत्तर बाजूकडील पूर्व–पश्चिम रस्त्याकरीता दक्षीण्णोत्तर ४ तसू हात **( खरेदीपत्रात नमूद केलेप्रमाणे)** रुंदीचा रस्ता याची चतुःसिमा–

पूर्वेस – सरकारी रस्ता.

पश्चिमेस – सि.स.नंबर ६०० ची मिळकत.

दक्षिणेस – सि.स.नंबर ६०१ ची उर्वरीत मिळकत.

उत्तरेस – बापू मल्लू परीट यांची मिळकत.

येणेप्रमाणे दावा मिळकतीचे वर्णनामध्ये निशाणी १ व निशाणी ५ या ठिकाणी अल्पसा फेरबदल करणे गरजेचे आहे. सबब त्याबाबतची दुरुस्ती करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी वादीचे अर्जास निशाणी ७९ वर त्यांचे म्हणणे दाखल केले करुन अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादींच्या मते वादींनी प्रस्तुत दावा हा दिनांक २२.०८.२०१६ रोजी दाखल केला असून जून २०२३ पर्यंत

वादी हे निशाणी ५ चा अर्ज या ना त्या कारणाने चालविणेस चालढकल करीत आहेत व दिनांक १९.०४.२०२१ रोजी निशाणी ६४ ला दावा दुरुस्तीचा अर्ज देऊन निशाणी ५ चालविणेसाठी चाल ढकल करीत आहेत. यामुळे वादी यांना निशाणी ५ चालविणेचे स्वारस्य दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा अर्ज देऊन दावा दुरुस्ती आधारे मूळ दाव्याचे स्वरुप बदलून नविन केस मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच केवळ दाव्याची सुनावणी लांबविणेच्या हेतूने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. यापूर्वीदेखिल वादीने दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता. परंतू तो काही काळानंतर चालविला नाही. वादी यांनी प्रतिवादी यांना आर्थीक व मानिसक त्रास देणेच्या अंतस्थ्य हेतूने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच सदरचा अर्ज मंजूर केल्यास दाव्यात मुलभून बदल होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम रुपये ५०००/– दंड करुन अर्ज फेटाळणेची विनंती केलेली आहे.

०४. प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि दोन्ही बाजुचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ? | **...नाही** |
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | **....होय** |
| ३. | काय आदेश ? | **...वादीचा अर्ज मंजूर करणेत आला** |

## –<u>कारणमिमांसा</u>–

०५. प्रस्तुत दावा, तसेच अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामुळे

सदर नियमात सांगितल्याप्रमाणे जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल व करण्यात येणारी दुरुस्ती ही पक्षकारातील वाद मिटवणेसाठी तसेच दावा गुणवत्तेवर निकाल होणेसाठी आवश्यक असेल तर सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास काही अडचण नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज हा वरील निकषान्वये निर्णित करणे आवश्यक आहे.

०६. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द कायम मनाईसाठी दाखल केला आहे. वादीने मागितलेल्या प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन करता, वादीने केवळ दावा मिळकतीतचे वर्णनामध्ये असलेली दुरुस्ती मागितलेली आहे. सदर दुरुस्तीचे स्वरुप पाहता वादीने मागितलेली दुरुस्ती दिल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी मदत होणार आहे. तसेच प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादींमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी यांना पुरावा देणेची संधी असलेने सदर दुरुस्तीमुळे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतू वादी मागत असलेली दुरुस्ती ही वादी यांना दावा दाखल करतेवेळी ज्ञात होती. परंतू तरीदेखिल त्यांनी त्याबाबत दाद मागितल्याचे दिसून येत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारीत करतो.

## – आदेश –

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी ७८) प्रतिवादी यांना रक्कम रुपये १५००/– (रक्कम रुपये एक हजार पाचशे फक्त) खर्चापोटी देणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदरची दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत करणेची आहे.

**३**. वादीने सदर दाव्याची दुरुस्त प्रत द्यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2023.08.25 14:44:56 +0530

दिनांकः– २४.०८.२०२३ ( एस.डी.शिरसाट)
ठिकाण – पेठवडगांव दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठवडगांव